दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक ६५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.५ जून २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# राज्यात मोठी रुग्णवाढ, मुंबईचा आकडा देतोय इशारा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. गेल्या २४ तासांत राज्यात १,३५७ नव्या कोरोना रुग्णांची वाढ झाली आहे. तर ५९५ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. रुग्णांची वाढती आकडेवारी आता प्रशासनासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारनं राज्यातील जनतेला सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरण्याचं आवाहन केलं आहे. राज्यातील वाढती रुग्णसंख्येत सर्वात मोठा वाटा मुंबईतील रुग्णसंख्येचा आहे. मुंबईत आज दिवसभरात ८८९ नवे कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. तर राज्यात कोरोनामुळे एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे.**



राज्यात शुक्रवारी १,०३४ रुग्णांची नोंद झाली होती. तर ५६३ रुग्णांनी कोरोनावर मात केली होती. त्यानंतर आज हा आकडा थेट १,३५७ वर पोहोचला आहे. राज्यातील कोरोना रुग्ण बरं होण्याचं प्रमाण ८.०६ टक्के इतकं झालं असून मृत्यूदर १.८७ टक्के इतका आहे.

वाढत्या कोरोना रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर राज्याचे आरोग्य सचिव प्रदीप व्यास यांनी जिल्हाधिकाऱ्यांना मास्क सक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु यानंतर आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी स्पष्टीकरण दिलं. आपल्याकडे मुबई, पुणे, पालघर, रायगड, ठाणे या जिल्ह्यांमध्ये थोड्याप्रमाणात कोरोनाबाधितांची संख्या वाढतेय. या पार्श्वभूमीवर केंद्राच्या आरोग्य विभागाकडून पत्रक आलं आहे. या जिल्ह्यातील लोकांसाठी उपाययोजना कराव्या लागतील आणि कोरोनाबाधितांची संख्या वाढू नये म्हणून उपाययोजना कराव्या लागतील.

त्याबाबतीत टास्क फोर्सची एक बैठक झाली. यात बंदीस्त ठिकाणी मास्क वापरण्याचं आवाहन करावं, असं ठरवण्यात आलं. तो आवाहनाचा मुद्दा आहे, त्यात मास्कसक्ती नाही, असं स्पष्टीकरण टोपे यांनी दिलं. इंग्रजीत मस्ट हा शब्द वापरल्यानं तो सक्तीचा असा होत नाही, मँडेटरी असा होत नसल्याचंही ते म्हणाले.

# राज्यात ६ जून शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात सोमवार दि. ६ जून रोजी शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी राज्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषद कार्यालयांमध्ये सकाळी सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत भगव्या स्वराज्यध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारुन त्यास अभिवादन करून राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन करण्यात येईल. सर्वांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांचा ६ जून १६७४ या दिवशी रायगडावर राज्याभिषेक झाला होता. या महापुरुषाच्या लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजेच शिवस्वराज्यभिषेक दिन होय. हा दिवस स्वराज्याची सार्वभौमत्वाची, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. अशा या दिनाचे महत्व आणखी दृढ होण्यासाठी ६ जून हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषद कार्यालयांमध्ये शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाच्या ग्रामविकास विभागाने १ जानेवारी २०२१ रोजी परिपत्रकाद्वारे हा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने यापुढे दरवर्षी ६ जून रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

# पूजा शिदोरेचा ट्रक अपघातात दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली- खोपोली मार्गावर मोटारसायकल व ट्रकच्या अपघातात १८ वर्षीय पूजा शिदोरे या तरुणीचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी (दि.४) दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. या अपघाती घटनेने नागोठणे टाउनशिप परिसरात शोक व हळहळ व्यक्त होत आहे.

नागोठणे येथील पूजा शिदोरे ही मित्र साहिल तायडे याच्यासोबत अॅडलॅब इमॅजिका येथे फिरण्यास अॅव्हेंजर मोटार सायकलवरुन जात होती. यावेळी खोपोलीजवळ आले असता समोरुन येणार्या ट्रकची जोरदार धडक लागली. यामध्ये मोटारसायकलवरील पूजा हिला गंभीर दुखापत झाली. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तिचा जागेवरच मृत्यू झाला.



पूजा बेलापूर येथील भारतीय विद्यापीठात बीबीएच शिक्षण घेत होती. ती बेलपाडा येथील वसतिगृहात राहत होती. तिचे वडील रिलायन्स टाऊनशीपमध्ये पुजारी म्हणून काम पाहतात. ही घटना समजताच संपूर्ण शिदोरे कुटूंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# खांदा कॉलनी सेक्टर १२ येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण

## विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनी, सेक्टर १२ येथील अंतर्गत रस्ते विविध कामासाठी सिडकोच्या माध्यमातून खोदकाम करण्यात आले होते. त्यानंतर त्या ठिकाणी तात्पुरते पॅचवर्क करून रस्ता डांबरीकरण करण्यात आला होता. परंतु पावसात ते पॅच निघाल्यामुळे पुन्हा खड्डे पडत असत या समस्येवर निवारण करण्यासाठी गेली काही महिने विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे हे अंतर्गत रस्ते संपूर्ण डांबरीकरण करण्यासाठी पाठपुरावा करत होते. सिडकोच्या माध्यमातून त्या ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण सुरू करण्यात आले. यावेळी पनवेल नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, शेकाप खांदा कॉलनी कार्याध्यक्ष योगेश




कोठेकर, शेकापचे युवा नेते मंगेश अपराज, स्थानिक सोसायट्यांमधील पदाधिकारी आणि रहिवासी उपस्थित होते. विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे

या कामात अंतर्गत रस्त्यावर संपूर्ण डांबरीकरण करून देण्यात येणार आहे अशी माहिती विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्याकडून देण्यात आली. याप्रसंगी तेथे उपस्थित …/२

# यशवंत नगर पंचक्रोशीतील जनता पाण्याविना

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीत एकूण सहा ग्रामपंचायतींचा समावेश असून त्यातील सुमारे पंचवीस ते तीस हजार लोकसंख्येला स्वतः ची हक्काची अशी पाणीपुरवठा योजना नसल्याने ऐन उन्हाळ्यातील पाणी टंचाईच्या कठीण काळात त्यांना पाण्यासाठी दाही दिशा भटकणे भाग पडत आहे.

नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील नारळ सुपारीच्या बागांतील विहिरी, विहुर ग्रामपंचायत हद्दीतील एक पाझर तलाव, अन्य गावातील ग्रामस्थांच्या परसदारच्या विहिरी तसेच गावोगावच्या पारंपरिक विहिरी व पाणवठे सोडल्यास येथिल सर्व ग्रामपंचायतींची आजतागायत जिल्हा परिषदेच्या व शासनाच्या अन्य तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना राबवून जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठीची तारेवरची कसरत सुरुच आहे. विशेष म्हणजे या सर्व पाणी योजनांद्वारे जनतेला पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याच्या शुद्धीकरणासाठी



कोणतीही यंत्रणा येथे नसल्याने हा सर्व पाणी पुरवठा अशुद्ध स्वरुपाचा असल्याचे माहीत असूनही जनतेला दुर्दैवाने त्यातही धन्यता मानावी लागत आहे.

बॅ. अंतुले साहेबांचा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून प्रथम समावेश होताच त्यांनी पंचक्रोशीतील जनतेसाठी नांदगाव ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबवली. येथिल ग्रामपंचायतींनी योजनेच्या दहा टक्केलोकवर्गणीही भरली. गावोगावी जलवाहिन्या, पाणी साठवण टाक्या बांधण्यात आल्या. वडघर कसाब येथील – नदीवर धरणाकरीता बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्यास कंत्राटदाराने माती घेण्याच्या कामास वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी वाटाण्याच्या अक्षता लावल्या. गेल्या पन्नास वर्षांपासून ही योजना रखडली ती कायमची. एकाही लोक प्रतिनिधीला, नेत्याला अथवा अधिकाऱ्याला तिचे पुनरुज्जीवन करावेसे वाटले नाही ही वस्तुस्थिती आहे. वांद्रे- वेळास्ते येथील नदीवर धरण बांधून येथिल जनतेच्या नशिबी आलेली …/२

## संक्षिप्त...

### भारतात लवकरच लाँच होणार इलेक्ट्रिक ट्रॅक्टर आणि ट्रक : ना.नितीन गडकरी

**दै.रायगड नगरी । पुणे**

इलेक्ट्रिक कार आणि इलेक्ट्रिक बसेस नंतर, आता आपण लवकरच इलेक्ट्रिक ट्रॅक्टर आणि इलेक्ट्रिक ट्रक लाँच करणार आहोत, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. ते आज पुण्यात राज्यस्तरीय साखर परिषद २०२२ ला संबोधित करत होते. यावेळी त्यांनी पर्यायी इंधनाचा वापर आणि महागाईच्या युगात त्याचे महत्त्वही यावरही भाष्य केले.

या राज्यस्तरीय साखर परिषदेचे आयोजन पुण्याच्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी गडकरी यांनी इथेनॉलसारख्या पर्यायी इंधनाच्या वापरावर भर दिला. गडकरी म्हणाले, इथेनॉलचा वापर शेती आणि उपकरणांमध्ये कशा पद्धतीने करता येईल, याचा प्रयत्न केला जात आहे. एवढेच नाही, तर पर्यायी इंधन हे ऊर्जे चे नवे भविष्य असल्याचेही ते म्हणाले. केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले, इथेनॉल आणि मिथेनॉलसारख्या पर्यायी इंधनांसोबतच इलेक्ट्रिक, हेही भविष्य आहे. मला चांगले आठवते, की ३ वर्षांपूर्वी मी इलेक्ट्रिक वाहनांबद्दल बोलत होतो, तेव्हा लोक मला अनेक प्रश्न विचारायचे. पण आता बघा, इलेक्ट्रिक-वाहनांना प्रचंड मागणी आहे आणि ती झपाट्याने वाढत आहे.

# केशवस्मृती सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अमित ओझे, तर उपाध्यक्षपदी ज्योती कानिटकर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील सर्वाधिक आर्थिक उलाढाल असलेल्या केशवस्मृती सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अमित ओझे, तर ज्योती कानिटकर यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.



केशवस्मृती सहकारी पतसंस्थेची सन २०२२ ते २०२७ करीता पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली असून सर्व संचालक मंडळाची निवड बिनविरोध करण्यात आली. संचालकपदी अविनाश महादेव कोळी, अशोक वसंत नाईक, मकरंद वसंत बापट, अमित ओझे, ज्योती कानिटकर, सुबोध बाळकृष्ण भिडे, प्रतीक देवचंद बहिरा, प्रफुल्ल विठ्ठल म्हात्रे, माणिक गोविंदराव देवकांबळे, संगीता मनोजसिंग परदेशी, अंजली सुधीर सिधये यांची निवड झाली आहे. …/२

# पाली विज महावितरण कार्यालयात रात्री वायरमन उपलब्ध करण्यासाठी पालीतील ग्रामस्थांचे निवेदन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली विज महावितरण कार्यालयात रात्रीच्या वेळी वायरमन उपलब्ध करण्याची मागणी पालीतील नागरिकांनी केली आहे. या मागणीचे निवेदन विज महावितरण कार्यालय पालीच्या उपकार्यकरी अभियंत्यांना देण्यात आले.

या निवेदनात म्हंटले आहे की रात्रीच्या वेळी वायरमन उपलब्ध नसल्यामुळे रात्री कोणत्याही कारणांमुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास लोकांची खूप मोठी गैरसोय होते. लहान मुले, गरोदर महिला, रुग्ण व वृद्ध यांचे खूप हाल होतात. वीज नसल्याने सरपटणाऱ्या प्राण्यांची देखील भीती आहे. शिवाय पावसाळा काही दिवसांवर आला आहे. त्यामुळे वारंवार छोट्या मोठ्या कारणांनी वीजपुरवठा खंडीत होतो. अशावेळी



आपल्या विज महावितरण कार्यालयात कर्मचारी उपलब्ध नसेल तर मोठी समस्या निर्माण होईल. तरी आपण रात्रीच्यावेळी आपल्या कार्यलयात एक वायरमन उपलब्ध करून घ्यावा ही नम्र विनंती. तसेच उपलब्ध …/२

# पावसाळी मासेमारी बंदीमुळे मासळीची आवक घटली : मासळीचे भाव गगनाला भिडले

**दै.रायगड नगरी । उरण**

१ जुन पासुन ३१ जुलै दरम्यान सलग ६१ दिवसांसाठी शासनाने खोल समुद्रातील पावसाळी मासेमारी बंदीच्या दिलेल्या आदेशानंतर राज्यातील मासेमारी ठप्प झाली आहे. यामुळे उरण परिसरातील सुमारे ७५० मच्छीमार नौकांनी विविध बंदरात नांगर टाकून विसावल्या आहेत. त्यामुळे मासळीची आवक मोठ्या प्रमाणावर घटली असल्याने मासळीचे भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. शासनाने १ जुन ते ३१ जुलै २०२२ पर्यंत पावसाळी मासेमारी बंदीचे आदेश जारी केले आहेत. पश्चिम तटवर्ती समुद्री क्षेत्रातील ६१ दिवसांच्या बंदीमुळे हजारो मच्छीमार बोटींनी करंजा, मोरा, रेवस, मुळेखंड आदि विविध बंदरात नांगर टाकला आहे. पावसाळी मासेमारी बंदीमुळे मासळीचा तुटवडा जाणवत असल्याने मात्र मासळी खवय्यांचे चांगलेच हाल होत आहेत.

राज्यातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या सात जिल्ह्यात मासेमारी व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. हवामान आणि निसर्गाच्या लहरीवरच चालणार्या या व्यवसायावर सुमारे १२ लाखाहुन अधिक कुटुंब उदरनिर्वाह चालवितात.विविध प्रकारातील मासेमारी व्यवसायातुन मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. निर्यातीच्या …/२

# महागाई विरोधात राष्ट्रवादी महिला आघाडी आक्रमक; तहसीलदार यांना दिले निवेदन

**दै.रायगड नगरी । तळा**

केंद्र सरकारने राबविलेल्या धोरणामुळे राज्यात व देशात महागाईने उच्चांक गाठला आहे. पेट्रोल डिझेलचे दर गग- नाला भिडले असून सी.एन.जी. चे दरही वाढले आहेत इंधनच महाग झाल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचे भाव कडाडले आहेत गॅसचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने ज्यांच्या हातात घराचं अर्थसंकल्प आहे अशा महिला भगिनींना घरखर्च चालविणे अवघड झाले आहे आणि म्हणूनच आज रोजी रायगड जिल्ह्याचे खासदार सु- नील तटकरे तसेच रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.आदीतीताई तटकरे यांच्या



मार्गदर्शनाखाली व रायगड जिल्हा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा उमाताई मुंढे यांच्या नेतृत्वाखाली तळा तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्यावतीने तहसीलदार कनशेट्टी यांना महागाई विरोधात निवेदन देण्यात आले.

यावेळी तळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्षा सौ.जान्हवी शिंदे तळा शहराच्या अध्यक्षा सौ. मेघा सुतार, उपाध्यक्षा सौ.आयेशा …/२

# नको अशांतीचे बिंग!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मतदारसंघ असलेल्या वाराणसीतली ज्ञानवापी मशीद हे मुळातले मंदिर होते का, यासंबंधीचा दावा न्यायालयात असताना आणि त्यानंतर इतरही अनेक ठिकाणचे असे विवाद उफाळून येत असताना, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी काही महत्त्वपूर्ण विधाने केली आहेत. नागपुरात दर वर्षी संघाच्या स्वयंसेवकांच्या औपचारिक प्रशिक्षणाचा अंतिम टप्पा मानला जाणारा तृतीय वर्षाचा वर्ग चालतो. करोनाकाळात असे दोन वर्ग होऊ न शकल्याने, यंदाच्या वर्गाला आणि त्याच्या समारोपालाही वेगळे महत्त्व होते. यावेळच्या भाषणात भागवत यांनी देशकालस्थितीचा सविस्तर आढावा घेतला असला, तरी धर्मस्थळांचे विवाद एका मर्यादेपलीकडे वाढवता कामा नयेत, हा स्पष्ट संदेश त्यांनी दिला आहे. 'अयोध्या हा अपवाद होता' असे सांगून त्यांनी सध्याच्या अशा साऱ्या आंदोलने आणि कज्जेदलालीपासून संघाला अलिप्त केले आहे. असे करताना, 'प्रत्येक मशिदीच्या खाली शिवलिंग शोधायचे का?' या त्यांच्या प्रश्नाला स्वाभाविकच मोठी प्रसिद्धी मिळाली आहे. देवबंद या देशातील सर्वांत प्रभावी इस्लामी केंद्राचे उलेमा मुफ्ती असद कासमी यांनी भागवत यांचे हे प्रतिपादन उचलून धरताना, 'देशात शांतता, बंधुभाव राहावा आणि देशाने प्रगती करावी,' असे म्हटले आहे. देशातील प्रत्येक 'सेक्युलर' व्यक्तीची हीच इच्छा आहे, अशी पुस्तीही भागवत यांचे समर्थन करताना जोडली आहे. याच वेळी, वाराणसीचा विवाद न्यायालयात लढणारे वकील हरिशंकर जैन यांनी मात्र, 'आपला न्यायालयीन लढा चालू राहील,' असे म्हटले आहे. अर्थात, भागवतांनीही 'न्यायालयांचा निकाल साऱ्यांनी मान्य करावा,' असे म्हटलेच आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर वाराणसी आणि मथुरा यांच्या पाठोपाठ देशभरातल्या ठिकठिकाणच्या धर्मस्थळांबाबत दावे-प्रतिदावे करीत सरसावलेली मंडळी चार पावले मागे जातात का, हे पाहावे लागेल. भागवतांनी युक्रेन आणि रशिया यांच्या संघर्षाचा उल्लेख करून, भारत पुरेसा शक्तिमान असता, तर त्याने हा संघर्ष रोखला असता, असे म्हटले आहे. जगात कुठेही हिंसाचार भडकू नये आणि रक्तपात होऊ नये, अशी भूमिका घेत असताना, देशांतर्गत विवादांबाबतही सामंजस्याची व भातृभावाची भूमिका घेणेच तर्कसुसंगत होते. आजच्या स्थितीत ते आवश्यकही आहे. आता प्रश्न असा, की वाराणसी आणि मथुरा येथील धर्मस्थळांचा विवाद हाती घेतलेले लोक हा विषय कटाक्षाने न्यायालयीन चौकटीतच ठेवण्यास बांधील राहतात की नाही, हा आहे. याबाबत, अयोध्या आंदोलनाचे नेतृत्व केलेली संघटना म्हणून रा. स्व. संघ आणि विश्व हिंदू परिषद यांची विशेष जबाबदारी आहे. ते आंदोलन कसे हिंसक बनले आणि अनेकदा नेत्यांच्या हाताबाहेर गेले, हा इतिहास काही फार जुना नाही. आज विश्वशांतीची भाषा करणे सोपे असले, तरी तेव्हाच्या संघर्षातून उफाळलेल्या हिंसाचारात उभय धर्मांचे हजारो नागरिक बळी गेले आहेत. कारसेवकांना जिवंत जाळणे आणि नंतर नरेंद्र मोदी मुख्यमंत्री असलेल्या गुजरातमध्ये उफाळलेला हिंसाचार, हे काळे अध्याय पुन्हा कोणत्याही निमित्ताने लिहिले जायचे नसतील, तर संघाला आणखी स्पष्ट भूमिका घेऊन कोणत्याही धर्मस्थळाचा विवाद रस्त्यावर येत असल्यास आम्ही त्याला कडाडून विरोध करू, असेही म्हणावे लागेल. केवळ 'आम्ही त्यात नाही,' इतकेच म्हणून भागणार नाही. खरे तर, अयोध्येत बाबरी मशीद पाडली गेल्यानंतर, १५ ऑगस्ट १९४७ रोजी असणारी सर्व धर्मस्थळांची स्थिती 'जैसे थे' असावी, असा कायदा तेव्हाच्या पी. व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारने केला होता. सध्या त्या कायद्याच्या वैधतेलाही आव्हान दिले जात आहे. या साऱ्यांतून देशातील काही शक्ती आणि गट धर्मस्थळांचे विवाद विसरण्याच्या मन:स्थितीत नाहीत, असे दिसते. त्यांच्याबाबत 'सांगेन गोष्टी युक्तीच्या चार..' इतकीच भूमिका संघ घेतो, की 'हे खपवून घेतले जाणार नाही,' असे स्पष्टपणे सांगतो, हेही भविष्यात दिसेल. गेल्या काही दिवसांत बौद्ध इतिहासाच्या काही अभ्यासकांनी, हिंदूंनीही आक्रमण करून आमची देवस्थाने उद्ध्वस्त केली आणि ताब्यात घेतली, असा दावा केला आहे. खुद्द अयोध्येबाबतही हे झाल्याचे दावे केले जातात. हे असेच चालू राहिले, तर ते कधी संपणारच नाही. पुढची शेकडो वर्षे हेच करत बसावे लागेल. भागवत यांनी नेमक्या याच मानसिकतेवर बोट ठेवून, 'प्रत्येक मशिदीखाली शिवलिंग शोधायचे का,' असा प्रश्न केला. त्याचा अर्थ, खुद्द संघ परिवारातील सतत बाहू स्फुरत असणाऱ्यांनाही समजेल, अशी अपेक्षा आहे. या भाषणातून भागवत यांनी पुन्हा एकदा मुस्लिम समाजाकडे मैत्रीचा हात केलेला दिसतो. असाच त्यांनी राजधानीतील तीन भाषणांमध्येही केला होता. देशाची सर्वांगीण ऐहिक प्रगती व्हायची असेल आणि भारत खरोखरच विश्वगुरू व्हायचा असेल, तर जुन्या विवादांना कधी तरी निरोप द्यावाच लागेल. कविश्रेष्ठ बा. सी. मर्ढेकरांची आठवण काढून म्हणायचे, तर कोणतेही 'शिवलिंग हे अशांतीचे बिंग' ठरता कामा नये. मोहन भागवत यांनी हे नि:संदिग्ध शब्दांत सांगितले, याबद्दल त्यांचे अभिनंदन!

# कर्नाळा अभयारण्यातून बापलेकाची केली सुटका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्नाळा किल्लयावर वाट चुकलेल्या बाप-बेटा असलेल्या दोन ट्रेकर्सना पनवेल तालुका पोलिसांनी सुरक्षितरित्या खाली आणले आहे.

३ जून रोजी कर्नाळा किल्यावर ट्रेकिंगला गेल्यावर योगेश पद्माकर बिडकर (वय ५० वर्ष), वेदांत योगेश बिडकर (दोन्ही रा.ग्रीन मेडोस सोसायटी शिरढोन,पनवेल) हे कर्नाळाच्या मध्ये गेल्यावर वाट चुकले. त्यांनतर त्यांनी १०० नंबरला कॉल करून मदत पाहिजे असल्याचे सांगीतले.



डायल ११२ वर तात्काळ कॉल आल्यावर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस कर्नाळा किल्यावर रवाना झाले. त्या दोघांना पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र म्हात्रे व पोलीस नाईक घुले तसेच फॉरेस्ट डिपार्टमेंटचे तेजस भोजने व विलास वैजनाथ राठोड या सर्वांनी दुपारी साडे तीनच्या सुमारास सुखरूपरित्या कर्नाळा किल्याच्या खाली आणले.

# साखर उद्योगाच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे दूरगामी धोरण आखावे : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । पुणे**

केंद्रीय पातळीवर साखर उद्योगात भविष्यात येणाऱ्या समस्या लक्षात घेऊन दूरगामी धोरण आखल्यास त्याचा सकारात्मक परिणाम या उद्योगाच्या प्रगतीवर होईल. त्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीनी एकत्र यावे, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

वसंतदादा साखर इन्स्टिट्युट येथे आयोजित साखर परिषद-२०२२ च्या उद्घाटनप्रसंगी दूरदृष्य प्रणालीद्वारे ते बोलत होते. कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, आरोग्यमंत्री राजेश टोपे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री विश्वजित कदम, सतेज पाटील, शंभुराज देसाई, खासदार श्रीनिवास पाटील, हेमंत पाटील, साखर आयुक्त शेखर गायकवाड, राष्ट्रीय सहकारी कारखाना महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, साखर उद्योग क्षेत्रातील नवे तंत्रज्ञान स्विकारून भविष्याचा वेध घेतला तर चांगली प्रगती साधता येईल. ब्राझीलने साखर उद्योगाच्या प्रगतीसाठी केलेल्या उपायांचा अभ्यास करून आपणही अनुकूल बदल करणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना संघटीत करून त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. आपला शेतकरी कष्टासाठी मागे पडत नाही. आपला कृषिप्रधान देश आहे. साखर, इथेनॉलच्या मागणीबाबत बाजाराचा अभ्यास करून कोणते उत्पादन करून बाजारपेठ काबीज करावी याचे मार्गदर्शन करावे लागेल. त्याच्या कष्टाला योग्य किंमत मिळावी यासाठी योग्य दिशा द्यावी लागेल. राज्य शासन साखर उद्योगाच्या उत्कर्षासोबत या क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

साखर उद्योग हा महाराष्ट्राचा मुख्य उद्योग आहे. या उद्योगातील क्षमता लक्षात घेऊन पुढील नियोजन करणे गरजेचे आहे. इथेनॉलचे महत्व लक्षात घेता त्याच्या निर्मितीवरही विशेष लक्ष द्यावे लागेल. ऊसतोड कामगार, शेतकरी, साखर कारखानदार हे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देत असतील तर त्यांना सहकार्य करणे शासनाचे कर्तव्य आहे. साखर कारखाने तोट्यात चालत असताना उद्योगाच्या नियोजनाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. साखर परिषदेमध्ये या उद्योगातील समस्यांवर विचार व्हावा. शेतकऱ्यांनी ऊसाच्या पीकासाठी सूक्ष्म सिंचनाचा उपयोग करावा, असेही मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी यावेळी सांगितले.

ऊस वाहतुकीचा प्रश्न, गाळपाचा प्रश्न, थकहमी याबाबत शासन सहकार्य करीत आहे. यापुढेदेखील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन मदत करेल. पण बदलत्या काळाप्रमाणे विकसीत तंत्रज्ञानाचा उपयोग करून त्याप्रमाणे बदल घडवून आणावा लागेल. इथेनॉल निर्मितीचे महत्व लक्षात घ्यावे लागेल. ऊसतोड कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ स्थापन केले आहे. त्या माध्यमातून ऊसतोड कामगारांचे प्रश्न सोडविता येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साखर परिषदेमध्ये अनेक अनुभवी आणि तज्ज्ञ व्यक्ती सहभागी झाल्याने ही परिषद या क्षेत्रातील व्यक्तींना मार्गदर्शक ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय मंत्री श्री.गडकरी म्हणाले, आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कृषि आणि ग्रामीण क्षेत्रात क्रांतीची गरज आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषी आणि निगडीत क्षेत्राचे प्रमाण केवळ १२ टक्के आहे. शेतकरी संपन्न झाल्याशिवाय देशाच्या प्रगतीत अनेक अडचणी आहेत. आकांक्षित जिल्ह्यातही शेतीला समृद्ध केल्याशिवाय आपल्याला पुढे जाता येणार नाही. यादृष्टीने साखर उद्योग हा कृषि आणि ग्रामीण क्षेत्राच्यादृष्टीने महत्वाचा आहे. येत्या काळात संशोधनाला खूप महत्व आहे. कृषि क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या उपयोगाद्वारे बदल घडवून आणणे गरजेचे आहे. ज्ञानाचे आर्थिक सुबत्तेत परिवर्तन करणे आवश्यक आहे. भविष्यात आपल्या देशात २५ लाख कोटी इंधन आयातीसाठी खर्च करावा लागणार आहे. रस्ते वाहतूकीत वाढ होऊन वाहनांची संख्याही वाढणार आहे. त्यामुळे इथेनॉल, मिथेनॉल, ग्रीन हायड्रोजन, इलेक्ट्रीक या पर्यायांना खूप वाव आहे. आपल्या देशात पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल टाकण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार १ हजार कोटी लिटर इथेनॉल लागणार आहे. तेवढे उत्पादन करण्याची आपल्या साखर कारखान्यांमध्ये क्षमता नाही. येणाऱ्या काळात ऊसाचे दर कमी होणार नाहीत, मात्र साखरेचे दर कमी होऊ शकतील. त्यामुळे येणाऱ्या काळात साखर उद्योग इथेनॉलकडे वळविणे ही काळाची गरज आहे. पेट्रोलियम मंत्र्यांशी बोलून यासाठी मार्ग काढावा लागेल.

नव्या तंत्रज्ञानामुळे इथेनॉलचे उपयोगिता मूल्य पेट्रोल एवढेच होणार असल्याने त्यांच्या किंमतीवरही फरक होईल. इथेनॉल हे हरित इंधन आहे, त्यामुळे प्रदूषण कमी होते. पुण्यात इंडियन ऑईलचे तीन पंप सुरू करण्याच्या सूचना कंपन्यांना करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होण्यासोबत पुण्यातील प्रदूषण कमी होण्यासही मदत होईल. त्यामुळे शासनाने पुण्यात इथेनॉलचे पंप सुरू करण्यास पुढाकार घ्यावा. इथेनॉल निर्मिती शेतकऱ्यांना समृद्ध केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ड्रोनद्वारे फवारणी फायदेशीर आणि अधिक परिणामकारक असल्याने सुशिक्षित युवकांना सहाय्य करून त्यांच्या माध्यमातून ड्रोनद्वारे खत फवारणीबाबतही शासनाने प्रयत्न करावा. वसंतदादा साखर इन्स्टिट्यूटने त्याबाबत मार्गदर्शन करावे. शेतकऱ्यांना सौरऊर्जेद्वारे वीज देण्याबाबतही विचार व्हावा, अशी सूचना केंद्रीय मंत्री श्री.गडकरी यांनी केली. खासदार श्री. पवार म्हणाले, भविष्यात ऊसाचे क्षेत्र आणखी वाढणार आहे. त्यामुळे येत्या हंगामात ऊस तोडणीचे नियोजन हंगाम सुरू होण्याआधी करावे लागेल. ऊस तोडणी आणि वाहतूकीचा प्रश्न गंभीर होत आहे. साखर आयुक्तालय आणि साखर कारखान्यांनी योग्य नियोजन करून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

देशात कोळसा टंचाईमुळे वीज निर्मिती कमी होत आहे. याचा परिणाम उद्योग आणि शेतीवर होत आहे. ऊसाच्या बगॅसच्या माध्यमातून ३ हजार ६०० मेगावॅट वीज निर्मिती होऊ शकते. सध्या महाराष्ट्रामध्ये २४७० मेगावॅट स्थापित क्षमतेचे सहवीज निर्मिती प्रकल्प आहेत. त्यापैकी आपण ६५ ते ७० टक्के वीज महावितरणला दिली तरी अंदाजे १६६० मेगावॅट वीज राज्य सरकारला मिळू शकते. यासाठी बगॅस आधारीत प्रकल्पाच्या उभारणीसाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

त्याचसोबत सौर ऊर्जेचा उपयोग करणेही आवश्यक आहे. राज्यात सौरऊर्जा निर्मितीसाठी भरपूर वाव आहे,मात्र त्यासाठी निधीची उपलब्धता होणे गरजेचे आहे. केंद्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन इथेनॉल साठवणूकीची क्षमता वाढविणे आणि त्यासाठी गुंतवणूक, रेल्वेने वाहतूक करण्याची योजना आणि इथेनॉल खरेदी याबाबत तेल कंपन्यांचे धोरण अधिक अनुकूल होण्याची गरज आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खांदा कॉलनी सेक्टर १२ येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण

असलेल्या सर्व सोसायटीमधील रहिवासीयांनी प्रीतम दादांनी वेळोवेळी लक्ष घालून आवश्यक तेव्हा पाण्याचे त्यांच्या संस्थेमार्फत मोफत टँकर पाणीपुरवठा, पाणीपुरवठा नियोजना संदर्भात वेळोवेळी लक्ष देणे, परिसरातील आरक्षित गार्डन प्लॉटवर स्वच्छता करून देणे, सोसायट्यांना स्वतःच्या निधीमधून कचऱ्याचे डबे देणे, व इतर कोणत्याही आवश्यक त्या वेळी मदत करणे अशा विविध समाजपयोगी कामासंदर्भात विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे आणि शेकाप नगरसेवकांचे आभार मानले.

## यशवंत नगर पंचक्रोशीतील जनता पाण्याविना

पाणी टंचाई दूर करावी या हेतूने गेल्या काही वर्षांपूर्वी खासदार तटकरेंच्या सहकार्याने सुमारे ४५ कोटींच्या योजनेची पहाणीसह रॉक टेस्टींगही करण्यात आली होती. परंतु प्रकल्पग्रस्त शेतकर्यांचा संघटनेने जमीन हस्तांतरणास नकार देऊन विरोध केल्याने सदर योजनाही गुंडाळली गेली आहे.

दरम्यान, माजगाव ग्रामपंचायतहद्दीतील खोकरी येथिल बारमाही जिवंत स्त्रोतांच्या पाण्याला आडवून तेथे धरण बांधल्यास येथिल नैसर्गिक पाणी पंचक्रोशीतील नागरिकांना पुरवता येऊ शकते असे येथील काही ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तर खारआंबोली येथिल धरणाचे पाणी जवळपास पंधरा ते वीस कि.मी. अंतराची जलवाहिनी टाकून पंचक्रोशीतील नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा करावा, असे येथिल नागरिकांनी एका निवेदनाद्वारे खासदार, पालकमंत्री, आमदार तसेच शेकाप आमदारांनाही साकडे घातले आहे. नुकताच कोरोनाचा कठीण काळ संपला आहे. नव्या पाणी योजना राबविण्यासाठी शासनाकडे निधीची वानवा आहे. मुरुड तालुक्यात दरवर्षी भरपूर पाऊस पडतो. गतवर्षी तर ढगफुटी होऊन हाहाकार माजला होता. अनेक मोठे पुल, साकव पाण्याने वाहून गेले. पडलेले पावसाचे पाणी जवळच्याच समुद्राला जाऊन मिळाले आणि मे महिन्याच्या कठीण काळातील परिस्थिती दरवर्षी 'जैसे थी' तशीच आहे. जनता पारंपरिक विहिरीतून लोटा लोटा भरुन पाणी गोळा करुन हंडे कळशी भरत आहेत आणि पावसाने लवकर पडावे म्हणून याचना करत आहेत.

## केशवस्मृती सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अमित ओझे, तर उपाध्यक्षपदी ज्योती कानिटकर

संचालक मंडळाच्या पहिल्या बैठकीत अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यामध्ये पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अमित ओझे, तर उपाध्यक्षपदी ज्योती कानिटकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाली. या निवडणुकीसाठी पनवेलचे सहाय्यक निबंधक बालाजी वाघमारे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पहिले.

## पाली विज महावितरण कार्यालयात रात्री वायरमन उपलब्ध करण्यासाठी पालीतील ग्रामस्थांचे निवेदन

करून दिलेला वायरमन नागरिकांचे फोन उचलेल, रात्री कार्यालयातच राहील आणि विजेच्याबाबत आलेल्या तक्रारींचे निरसन करेल याची शाश्वती द्यावी अशी मागणी देखील निवेदनात केली आहे. निवेदन देतेवेळी रितेश आंबेकर , नागेश आंबेकर कल्पेश आंबेकर, गजानन शिंदे, सुमित शिंदे, रोशन आंबेकर, दत्तात्रेय शिंदे व संकेत शिंदे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## पावसाळी मासेमारी बंदीमुळे मासळीची आवक घटली : मासळीचे भाव गगनाला भिडले

व्यवसायातुन देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते. मात्र देशाला प्रचंड परकीय चलन मिळवुन देणाऱ्या मासेमारी व्यावसायिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सातत्याने होणारी इंधन दरातील वाढ, मासळीला न मिळणारा हमीभाव, संघटीत दलांलाकडुन होणारी प्रचंड लुबाडणुक,शासनाकडून डिझेल परतावे मिळण्यास होणारा विलंब या तर मच्छीमारांना नित्याच्याच भेडसाविणार्या समस्या आहेत.

या शिवाय मच्छीमारांना शासनाकडुन यांत्रिक बोटी बांधणे,यांत्रिक स्पेअर्स पार्ट,नेट आणि इतर सामुग्रीवर मिळणार्या विविध सवलतीही मिळणे बंद झाल्या आहेत. दररोज वाढत जाणारे साधन सामुग्रीचे भाव तर मच्छीमारांच्या तोंडचे पाणीच पळवतात.खोल समुद्रात मासेमारीसाठी कामगार वर्गही मोठ्या प्रयासाने उपलब्ध झालेच तर समुद्रात जाणविणार्या मासळी दुष्काळाचा सामना करण्याची नामुश्किलीची पाळी मच्छीमार व्यावसायिकांवर येते.त्यामुळे खोल समुद्रातील मासेमारीसाठी एका ट्रिपवर होणारा खर्चही वसुल होत नाही.त्यातच कोरोना महामारी,खराब वादळी हवामान आणि उद्भवणार्या नैसर्गिक आपत्तीमध्ये काही दिवस व्यवसाय बंद ठेवावा लागतो.

इतक्या समस्यांच्या विळख्यात अडकलेल्या मच्छीमारांवर गलितगात्र होण्याची येते.त्यातुन उभारण्याची संधी मिळे तोपर्यत शासनाच्या पावसाळी मासेमारी बंदीचे आदेशही लागु होतात.राज्य सरकारचे १ जूनपासून ६१ दिवसांची पावसाळी मासेमारी बंदीचे आदेश जारी झाले आहेत. मासेमारी बंदीच्या आदेशानंतर हजारो मासेमारी नौका विविध बंदरात तसेच उरण परिसरातील करंजा, मोरा,रेवस, मुळेखंड,गव्हाण,खोपटा आदि बंदरात नांगर टाकुन विश्रांती घेत आहेत.पावसाळी मासेमारी बंदी लागू झाल्यानंतर दोन दिवसातच मासळीची आवक मोठ्या प्रमाणावर घटली आहे.त्यामुळे मासळीचा तुटवडा जाणवत आहे.

मासळीची आवक घटल्याने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मासळीचे भाव चांगलेच कडाडले असल्याची माहिती मासळी व्यावसायिक हेमंत गौरीकर यांनी दिली.त्यामुळे मासळी खवय्यांची चांगलीच पंचाईत झाली आहे. खोल समुद्रातील मासेमारी बंद झाल्याने आता स्थानिक मच्छीमारांकडून बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या मांदेली, बोंबील, निवठ्या,भिलजी, कोळीम, बळा,खेंगट, खुबे, कालवे,चिंबोरी,मुठे,किळशी, ढोमी, चिवणी, कोळंबी,वाकटी,बांगडे, तळ्यातील गोडी मासळी आणि सुकी मासळी येऊ लागली आहे. या दुय्यम प्रतीच्या मासळीवर आता खवय्यांची गर्दी होऊ लागली आहे.

भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर महाराष्ट्र राज्याच्या दोन महिने आधीच मासेमारी बंद करण्यात येते. राज्यातील पावसाळी बंदीनंतर पश्चिम किनारपट्टीवरील मासेमारीला सुरुवात होते.त्यामुळे चांगल्या प्रतीची मासळी राज्याबाहेरील कोलकता ते कन्याकुमारी किनारपट्टीवरील तसेच गुजरात, गोवा, पश्चिम बंगाल येथुन कंटेनरमध्ये मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी मुंबईत येत असते.मात्र परराज्यातुन येणाऱ्या चांगल्याप्रतीच्या मासळीचे भावही सामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने खवय्यांच्या खिशाला चांगलीच चाट बसत असल्याची माहिती करंजा मच्छिमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र नाखवा यांनी दिली आहे.

## महागाई विरोधात राष्ट्रवादी महिला आघाडी आक्रमक; तहसीलदार यांना दिले निवेदन

पल्लवकर, शेणवली ग्रामपंचायत सरपंच सौ. निकिता गायकवाड शहर युवती अध्यक्ष दिव्या वडके नगरसेविका सौ. सारिका गवळी सौ. रंजना पिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# टेंभी गावचा पाणी प्रश्न निकाली ; ग्रामस्थांनी मानले आभार



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली नगरपंचायतीच्या कार्यकुशल नगराध्यक्षा गिताताई पालरेचा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामांना गती मिळाली आहे. नागरिकांना भेडसावणारे मूलभूत व पायाभूत नागरी सेवा सुविधा देण्यावर विशेष भर दिला जात आहे.

पाली नजीक असलेल्या टेंभी वसाहतीला पाणी समस्या भेडसावत होती. त्यामुळे नगरपंचायतीचे पाणी पुरवठा सभापती सुलतान बेणसेकर यांनी नगराध्यक्ष गीताताई पालरेचा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक १४ टेंभी वसाहत येथे दोन हजार लीटर पाण्याची टाकी बसविण्यात आली. त्यामुळे येथील नागरिकांना आता मुबलक पाणीपुरवठा होऊन पाण्यासाठी होत असलेली कसरत आता थांबणार आहे. पाण्याची टाकी बसवून पाणी प्रश्न सोड सोडविल्याने येथील ग्रामस्थानी पाणी पुरवठा सभापती सुलतान बेंणसेकर व टीमचे आभार मानले. येथील ग्रामस्त आता समाधानी व आनंदी झाल्याचे यावेळी पहावयास मिळाले.

यावेळी बोलताना सुलतान बेणसेकर म्हणाले की टेंभी येथील पाणी प्रश्न जसा मार्गी लावण्यात आम्ही यशस्वी झालो, त्याच पद्धतीने झाप आदिवासी वाडी, तलई आदिवासी वाडी, आगरी समाज येथे येत्या दोन दिवसात पाण्याच्या टाक्या बसविण्यात येणार असल्याचे बेणसेकर म्हणाले. तसेच पालीतील पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन २५ ते ३० वर्षांपूर्वी ची जुनी असल्याने तिला बऱ्याच ठिकाणी गळती लागली आहे. पाईपलाईन ची गळती काढण्यात आली असून भविष्याचा वेध घेत पालिकरांना नियमित व मुबलक पाणीपुरवठा व्हावा याकरिता नवीन योजना मंजूर करण्यात आली असून लवकरच या कामास प्रारंभ होणार असल्याची माहिती पाणीपुरवठा सभापती सुलतान बेणसेकर यांनी दिली.

उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, बांधकाम सभापती प्रणालीताई शेळके, पाणी पुरवठा समिती सदस्य नगरसेवक सुधीर भालेराव सामाजीक कार्यकर्ते सूरज शेळके आणि कामगार वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सुशीला पत्की यांचे वृद्धापकाळाने निधन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील जोगेश्वरी नगर (गावठाण) येथील रहिवासी श्रिमती सुशीला रामचंद्र पत्की ( वय९४) यांचे गुरुवार २ जून रोजी रात्री ९.३० वा. च्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. नागोठण्यातील जोगेश्वरीनगर (गावठाण) मधील दिवंगत जेष्ठ पत्रकार रामचंद्र पत्की यांच्या त्या पत्नी तसेच पत्रकार मंगेश पत्की यांच्या त्या आजी होत. कै. सुशीला पत्की यांच्या पश्चात विजय व अजय ही दोन मुले, सुना, नातवंडे, पतवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. कै. सुशीला पत्की यांच्या पार्थिवावर शुक्रवार ३ जून रोजी सकाळी ११ वा. येथील अंबा घाटावरील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नागोठण्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्की कुटूंबियांचे नातेवाईक, जोगेश्वरी नगर मधील ग्रामस्थ तसेच नागोठण्यातील नागरिक उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# प्रदूषण रोखूया.. चला ‘ईव्ही’ वापरू या



वातावरणीय बदलांचे दुष्परिणाम रोखण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. यामधील एक म्हणजे राज्याचे इलेक्ट्रीक वाहन (ईव्ही) धोरण. राज्य शासनाने या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक पाऊल टाकले आहे. चला आपणही ईव्ही वापरून या प्रयत्नांना हातभार लावूया...

वातावरणीय बदलांचे गंभीर परिणाम आता जगभरातील नागरिक अनुभवत आहेत. उष्णतेमधील वाढ, वारंवार येणारी चक्रीवादळे, अतिवृष्टी तर कधी दुष्काळ अशा विविध आपत्तींमुळे शासनाला हजारो कोटी रूपये नुकसान भरपाईसाठी खर्च करावे लागत आहेत. या आपत्तींची कारणे वेगवेगळी असली तरीही याचे मूळ हे वातावरणीय बदलांमध्येच आहे, हे निश्चित. यामुळे होत असलेले दुष्परिणाम भविष्यात अधिक गंभीर होत जाण्याची शक्यता आहे. ते कमी करण्यासाठी शासन हा विषय गंभीरपणे हाताळत आहे.

निती आयोगाच्या अंदाजानुसार ईव्हीच्या वापरामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण जवळपास ३७ टक्के कमी होऊ शकते. यासाठी शासनाने उत्पादक, वापरकर्ता आणि पर्यावरण रक्षण या सर्वांचा विचार करून २०२१ मध्ये सुधारित इलेक्ट्रीक वाहन धोरण जाहीर केले आहे. महाराष्ट्रात शाश्वत आणि प्रदूषणरहीत वाहनांचा अंगीकार करणे, इलेक्ट्रीक वाहनाच्या वापरात महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर बनविणे, भारतात वाहन उत्पादनातील महाराष्ट्राचे आघाडीचे स्थान कायम राखणे आणि इलेक्ट्रीक वाहन आणि त्यासंबंधित घटकांकरीता जागतिक पातळीवर एक प्रमुख उत्पादक आणि गुंतवणूक केंद्रस्थान म्हणून उदयास येणे हे या धोरणाचे लक्ष्य आहे. ईव्हींच्या वापरामुळे इंधनाच्या आयातीवर होणाऱ्या खर्चातही बचत होईल. वातावरणीय बदल थांबवण्यासाठी जगभरात पुढील काळात जी क्रांती होणार आहे, त्यात महाराष्ट्र म्हणून आपण कुठेही मागे पडणार नाही यासाठी देखील हे पाऊल महत्वाचे ठरणार आहे.

हवेचे व ध्वनीचे वाढते प्रदूषण, मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड आदींमुळे निसर्गाचा समतोल बिघडू लागला आहे. शुद्ध हवा ही आजची निकड आहे. ही निकड पूर्ण होण्यास ईव्हींच्या वापरामुळे निश्चितच हातभार लागेल. त्याचबरोबर वायू आणि ध्वनी प्रदूषणही कमी होईल. विकास हा महत्त्वाचा आहेच, पण तो शाश्वत आणि पर्यावरणपूरक असणे गरजेचे आहे, हा मुख्य उद्देश देखील यामुळे साध्य होईल. या धोरणाची सुरूवात सार्वजनिक वाहतुकीसाठी ईव्ही वापरून केली जात आहे.

थोडक्यात महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण :

अभियान (Mission) : मागणीविषयक प्रोत्साहनाद्वारे महाराष्ट्रात इलेक्ट्रीक वाहनांची खरेदी आणि वापर वाढवून राज्याच्या वाहतूक परिस्थितीत अनुकूल बदल घडवून आणणे. तसेच उत्पादकांसाठीच्या प्रोत्साहनाद्वारे राज्यात गुंतवणूक आकर्षित करून, इलेक्ट्रीक वाहन निर्मितीचे कारखाने तसेच डव्हान्स केमिस्ट्री बॅटरी सेल (ACC) आणि इलेक्ट्रीक वाहन रिसायक्लिंग कारखाने राज्यात स्थापित करून उत्पादनास प्रोत्साहन देणे हे या धोरणाचे मिशन आहे.

धोरणाची उद्दिष्टे (Objectives) : सन २०२५ पर्यंत नवीन वाहन नोंदणीत १० टक्के हिस्सा बॅटरी इलेक्ट्रीक वाहनांचा असेल, अशा रितीने वाहनांचा वापर वाढविणे. मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या सहा प्रमुख शहर समूहांमध्ये किमान २५ टक्के सार्वजनिक वाहतूक वाहने ही बॅटरी इलेक्ट्रीक वाहन प्रकारातील असावीत. तसेच एसटी महामंडळाच्या एकूण ताफ्यापैकी १५ टक्के बसेस इलेक्ट्रीक असाव्यात. सहा प्रमुख शहर समूहांमधील ओला, उबर, मेझॉन, फ्लिपकार्ट आदी ताफा परिचालक, ताफा समूहक यांच्या एकूण वाहनांपैकी २५ टक्के वाहने ही इलेक्ट्रीक असावीत. महाराष्ट्राला भारतातील इलेक्ट्रीक वाहन उत्पादन क्षमतेच्या बाबतीत सर्वोच्च उत्पादक राज्य करणे. राज्यात डव्हान्स केमिस्ट्री सेल बॅटरी उत्पादनासाठी किमान एक गिगाफॅक्टरी स्थापित करणे. राज्यात इलेक्ट्रीक वाहने आणि त्यांचे घटक यासाठी संशोधन आणि विकास तसेच कौशल्य विकास यांचे नियोजन करणे ही या धोरणाची उद्दिष्टे आहेत.

सहा प्रमुख शहरे आणि चार प्रमुख महामार्ग यावर २५०० इलेक्ट्रीक वाहन चार्जिंग स्टेशन्स उभी करणे. तसेच शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत व शासनाच्या निधीमधून खरेदी करण्यात येणारी वाहने ही बॅटरी इलेक्ट्रीक वाहने असतील हे या धोरणाचे लक्षांक आहे.

प्रस्तावित धोरणाचा कार्यकाळ हा २०२१ ते २०२५ असा असणार आहे. यासाठी शासनाने ९४० कोटींची आर्थिक तरतूद केलेली आहे. या धोरणात मागणी, चार्जिंग सुविधांची निर्मिती आणि उत्पादन क्षेत्र अशी तीन प्रकारची प्रोत्साहने दिली जातील. या व्यतिरिक्त बिगर-वित्तीय प्रोत्साहने व कौशल्य विकास उपक्रम प्रस्तावित आहे, ज्याअन्वये महाराष्ट्र राज्य हे ईव्ही संबंधी देशात अग्रेसर होईल.

मागणी विषयक प्रोत्साहनाअंतर्गत वाहन बॅटरी क्षमतेनुसार वाहन खरेदीसाठी प्रती वाहन अतिरिक्त प्रोत्साहन रूपये ५००० प्रती ज्ञथह दिले जाणार आहे. याचबरोबर प्रथम नोंदणी होणाऱ्या एक लाख दुचाकी वाहनांसाठी कमाल रूपये १० हजार प्रती वाहन, प्रथम नोंदणी होणाऱ्या २५ हजार तीनचाकी वाहनांसाठी कमाल रूपये ३० हजार प्रती वाहन आणि प्रथम नोंदणी होणाऱ्या २० हजार चारचाकी वाहनांसाठी कमाल रूपये १ लाख ५० हजार प्रती वाहन प्रोत्साहन दिले जाईल.

वाहन मोडीत काढण्यासाठी (स्क्रॅपेज धोरणानुसार) प्रती वाहनास जास्तीत जास्त रूपये २५ हजारपर्यंत प्रोत्साहन. दुचाकी आणि तीनचाकी वाहनांसाठी आश्वासित बायबॅक आणि बॅटरी हमी प्रोत्साहन. तसेच सर्व इलेक्ट्रीक वाहनासाठी, मोटर वाहन कर आणि नोंदणी शुल्कामध्ये १०० टक्के माफी आदी प्रोत्साहने देण्यात येतील.

ईव्ही चार्जिंग पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रोत्साहने जाहीर करण्यात आली आहेत. यानुसार राज्यात व्यापक प्रमाणात पायाभूत ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी १५ हजार मंदगती चार्जिंग स्टेशनकरिता प्रती चार्जिंग स्टेशन १० हजार रूपये तर मध्यम/ वेगवान गतीच्या ५०० चार्जिंग स्टेशनकरिता प्रती चार्जिंग स्टेशन पाच लाख रूपये महत्तम प्रोत्साहन दिले जाईल. ईव्ही चार्जिंग स्टेशनला सोयीसुविधा म्हणून मान्यता देऊन स्थानिक स्वराज संस्था शहरांच्या विकास योजनांमध्ये ईव्ही चार्जिंग स्टेशनसाठी जागा राखीव ठेवतील. निवासी मालकांना त्यांच्या आवारात खासगी चार्जिंग स्टेशन स्थापित करण्यासाठी मालमत्ता करात सूट देण्यास प्रोत्साहित करतील. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महामार्गांवर चार्जिंग स्टेशनसाठी राखीव जागा ठेवल्या जातील.

मालमत्ता करात सूट : ईव्हीकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या नागरिक अथवा गृहनिर्माण संस्थांना हे धोरण लागू असेपर्यंत मालमत्ता करात विविध टप्प्यात सूट देण्याचा निर्णय नगरविकास विभागाने घेतला आहे. तथापि, हे करीत असताना इतर रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे.

उत्पादन क्षेत्र प्रोत्साहनाअंतर्गत शासनाने उत्पादन आणि संशोधन व विकास केंद्रे स्थापित करण्यासाठी तसेच यासंदर्भात गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. राज्यातील ईव्ही उत्पादन प्रकल्पाचे स्थान विचारात न घेता विशाल प्रकल्पाच्या ’डी+’ प्रवर्गाखालील/ इतर प्रवर्गातील श्रेणीतील सर्व लाभ या उद्योगांना देण्यात येतील.

सध्या मुंबईत सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या ‘बेस्ट’कडे ३८६ इलेक्ट्रीक बसेस आहेत, तर २१०० बसेस घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. मुंबई महानगरपालिकेनेही आपल्या ताफ्यात ईव्हींचा समावेश करून मार्गदर्शक संदेश दिला आहे. शासनाच्या विभागांमध्ये ईव्हीचा वापर करण्याची सुरूवात राजशिष्टाचार विभागाने ईव्ही घेऊन केली आहे.

नीती आयोगासमवेत मुंबईत झालेल्या बैठकीत आयोगाने राज्याच्या इलेक्ट्रीक वाहन धोरणाचे कौतुक केले. ‘महाराष्ट्राने भविष्याचा वेध घेऊन इलेक्ट्रीक वाहन धोरण आणून चांगले पाऊल टाकले’ अशा शब्दात मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांनी प्रशंसा केली. या वाहनांचा उपयोग आणि चार्जिंग स्थानके वाढविण्याच्या त्यांच्या सूचनेनुसार विभागाची कार्यवाही सुरू आहे.

सार्वजनिक वाहतुकीसाठी यापुढे इलेक्ट्रीक वाहनांना प्राधान्य देण्याचे धोरण आहे. त्यानुसार या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न सुरू आहेत. पंधराव्या वित्त आयोगाने राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत हवेचा दर्जा सुधारण्यासाठी अनुदानाचे वाटप केले आहे, इलेक्ट्रीक वाहनांचा अंगिकार हा हवेचा दर्जा सुधारण्यासाठी सहायक होऊ शकणार असल्याने लवकरच राज्यातील महत्त्वाच्या शहरांमधील सार्वजनिक वाहतुकीसाठी इलेक्ट्रीक वाहने असतील यादृष्टीने कालबद्ध नियोजन केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून सहा नागरी समुहांकरिता ४७०० इलेक्ट्रीक बसेसची तरतूद आहे.

वातावरणीय बदलांना मानव देखील जबाबदार आहे. त्याचे दुष्परिणाम रोखण्यासाठी शासन प्रयत्नशील आहेच. तथापि, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता ‘आज नाही तर कधीच नाही..’ या भावनेतून पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्रत्येकाने हातभार लावणेही तितकेच गरजेचे आहे, हे निश्चित.

**–ब्रिजकिशोर झंवर,**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर या चौकास नामफलक बसविणेत यावे

## वंचित बहुजन आघाडी, कर्जतची मागणी



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद क्षेत्रात (जुने एसटी स्टॅंड गुंडगे रोड) पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर या चौकास नामफलक बसविणेत यावा अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने करण्यात आली आहे, कर्जत नगरपरिषदेने लवकरात लवकर कार्यवाही न केल्यास पक्षाचे वतीने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडी अध्यक्ष धर्मेंद्र मोरे यांनी दिला आहे.

वंचित बहुजन आघाडी, ता.शाखा कर्जतच्या वतीने मा.मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद यांना निवेदन देण्यात आले आहे , कर्जत नगरपरिषदेने कर्जत शहरात अनेक चौकाचे नामकरण करुन महान व्यक्तींचे नावे चौकास दिले आहेत. परंतु सन २०१८ साली कर्जत नगरपरिषदेने ठराव पारित करून सुद्धा पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे चौकास नामफलक अद्याप बसवलेला नाही. सदर ठरावाची अद्याप अंमलबजावणी झाली नाही.

तरी दि.२०/१२/२०१८ रोजी पारित केलेल्या ठराव क्र.११२८ नुसार (जुने एसटी स्टॅंड गुंडगे रोड) या चौकाचे सुशोभीकरण करुन त्या चौकास पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर चौक असे नाम फलक बसून ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी जेणे करून बहुजन समाजामध्ये प्रशासनाबद्दल आदर व प्रेम निर्माण होईल सदर ठरावाची अंमलबजावणी न झाल्यास वंचित आघाडी कर्जत तालुका यांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळेस मा.मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी सुद्धा सकारात्मक प्रतिसाद देवुन लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल असे अश्वासन दिले.सदर निवेदन देताना वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष धर्मेंद्र मोरे, जिल्हा उपाध्यक्ष हरिश्चंद्र यादव, प्रदिप गायकवाड, कमलाकर जाधव, आशोक कदम आदि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे माजी उपमहापौर विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, धोकादायक विजेचे खांब काढण्यात आले आहेत.

प्रभाग १८ मधील ठाणा नाका रोड वरील स्टेटस हॉटेल च्या समोरील धोकादायक विजेचे खांब आज काढण्यात आले. स्वामी नित्यानंद मार्ग ते ठाणा नाका रोड चे रुंदीकरण व कॉंक्रीटकरण कामपूर्ण झाले होते परंतु रुंदीकरणांतर विजेचे खांब काढले न गेल्यामुळे ते रहदारीस अडथळा ठरत होते तसेच धोकादायक होत होते. एखादे वाहन त्यावर आढळून अपघात होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती,या विषयावर नगरसेवक विक्रांत पाटील यांनी अनेक पत्रं महानगरपालिकेला दिली आणि पाठपुरावा करीत राहिले. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि महानगरपालिकेने धोकादायक ठरत असलेले विजेचे खांब काढून घेतले. यावेळी स्वतः नगरसेवक विक्रांत पाटील यांनी उपस्थित राहून कामाची पाहणी केली.नगरसेवक विक्रांत पाटील हे प्रभागातील समस्या सोडवण्यासाठी नेहमीच प्राधान्य देतात त्याबद्दल प्रभागातील नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.



# देसाईपाडा येथे घरात शिरलेल्या नागाला सर्पमित्र चांद शेख यांनी दिले जीवदान

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील देसाईपाडा येथे शुक्रवारी ऋतिक कडू यांच्या घरात नाग शिरला होता. या नागाला येथील सर्पमित्र चांद शेख यांनी मोठ्या शिताफीने पकडले.

चांद शेख यांनी या नागाला बरणीत भरून जवळील जंगलात वनविभागाच्या मदतीने सुखरूप सोडून दिले. मानवी वस्तीत कोठेही साप आल्यास कोणीही घाबरून जाऊ नये. तसेच त्याला कोणतीही दुखापत न करता जवळच्या सर्पमित्राला बोलवावे असे आवाहन यावेळी चांद शेख यांनी उपस्थितांना केली.

# माथेरानमध्ये नेत्र तपासणी शिबीर ; गरजवंतांनी घेतला लाभ



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा आणि त्यांचे सहकारी तसेच श्री सद्गुरु कृपा व्हिजन ऑप्टिक्स यांच्या माध्यमातून नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एकूण २४३ गरजवंतांनी शिबिराचा लाभ घेतला.

माथेरान मधील सामाजिक क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन काम करणारे. गोरगरिबांच्या पाठीशी सदैव खंबीर पणे उभे राहणारे येथील स्थानिक व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा व त्यांचे सहकारी आणि श्री सद्गुरु कृपा व्हिजन ऑप्टिक्स यांच्या माध्यमातून नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एकूण २४३ गरजवंत नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरात मोफत कॉम्पुटरद्वारे नेत्र तपासणी करण्यात आली.

तसेच मोफत उत्तम प्रकारच्या चष्म्याची फ्रेम देण्यात आली. आणि स्वस्त दरात उत्तम प्रतीचे फायबर ग्लास चे चष्मे वाटप करण्यात आले. गुरुवार दि.२ आणि शुक्रवार दि ३ रोजी सकाळी १० ते ५ या वेळे दरम्यान हे शिबीर नितीन शहा यांच्या आर सी शहा जनरल स्टोअर माथेरान येथे आयोजित करण्यात आले होते.

# घराच्या पत्रावर केबलची वायर का आपटली असे बोलून केली शिवीगाळ व मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घराच्या पत्र्यावर केबलची वायर का आपटली असे वाद घालून शिवीगाळ व मारहाण केल्याचा प्रकार वावंजे येथे घडला आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जागृती दशरथ सांगडे (वय ४०) यांच्या शेजारी यांचे दीर बाकेश गोपाळ सांगडे व जाऊ लता सांगडे यांचे घर आहे. त्यांच्यासोबत त्यांचे किरकोळ वाद होत असतात. २९ मे रोजी जागृती घरात व घराबाहेरील साफसफाई करत होत्या. यावेळी साफसफाई करत असताना बाकेश सांगडे यांच्या घरावरून गेलेली केबलची वायर हलली. व ती घराच्या पत्रावर आपटली गेली. यावेळी जागृती व लता यांच्यात वाद झाले. लता व बाकेश यांनी त्यांना शिवीगाळ केली. व लता सांगडे यांनी जागृती याना धक्काबुक्की गेली. यावेळी बाकेश याने लाकडी दांडक्याने जागृती यांच्या कपाळावर उपट मारली. यात जागृती जखमी झाल्या. याप्रकरणी बाकेश आणि लता सांगडे या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**माणगांव नगरपंचायत, माणगांव**

ता.माणगांव, जि.रायगड, पिनकोड ४०२१०४ Email : nagarpanchayatmangaon@gmail.com, फोन नं.०२१४०२६३०५६

जा.क्र.मानपं/जा.नि./२०२२-२३ दिनांक : ०४/०६/२०२२

**जाहीर निविदा / फेर निविदा सूचना**

माणगांव नगरपंचायतीकडून जा.क्र./मानपं/जा.नि./२९२/२०२२-२०३, दि.०३/०६/२०२२ अन्वये जाहीर निविदा/फेरनिविदा प्रसिद्धी करण्यात आलेली होती. सदर निविदा भरण्याचा कालावधी दि.०६/०३/२०२२ पासून सुरू करण्यात येत असे नमूद करण्यात आलेले आहे. त्या ऐवजी दि.०६/०६/२०२२ सुरू करण्यात येईल असे वाचण्यात यावे.

सही/-
मुख्याधिकारी
माणगांव नगरपंचायत

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही आमचे अशिल यांनी मिळकतीचे प्रस्तावित मालक सौ.विजयालक्ष्मी दिलीपकुमार खेरोदिया यांचेकडून काही इसारा रक्कम देवून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : उसर्लीबुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | भोगवटादार वर्ग | क्षेत्र हे.आर.पॉ. (चौ.मी.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| उसर्लीबुद्रुक | ४६/६ | १ | ०-२२-९० | २-९४ |

येणेप्रमाणे जमीन मिळकत आहे. वर नमूद जमीन मिळकतीमध्ये वा मिळकतीपैकी कोणत्याही भगावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्तखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु., वा तत्सम कोणतेही दावे, मालकी वा अन्य हक्कहितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी, वा संबंधितांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे.

वरील विहित मुदतीत कोणाकडून कसल्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीबाबतचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच विहित मुदतीनंतर आलेल्या हरकती, तक्रारी, दावे हे रद्दबातल आहेत. त्या विचारार्थ, ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०५/०६/२०२२

**सही/-**
**ॲड.गिरीश शंकर पाटील**
**रा.गितांजली बिल्डींग, रामवाडी-पेण,**
**ता.पेण, जि.रायगड ४०२१०७**
**मो.नं.९१७२४४६००४**

Hon'ble Smt A.A.Godase Madam
Advocate Vinod Patel
Advocate for Application

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE
SENIOR DIVISION-PANVEL, AT PANVEL

Civil M.A.No. 749/2022
Exh : 7/D
Next Date : 06/07/2022

1) Mr.Swanand Govind Gokhale Applicant No.1
Age : 42 Years, Occupation : Service
Residing at B-404, New Nityanand CHS Ltd,
Plot No.28, Sector No.03, New Panvel (E)
Maharashtra-410206
2) Mr.Anand Govind Gokhale Applicant No.2
Age : 38 Years, Occupation : Service
3) Mrs.Sandhya Govind Gokhale Applicant No.3
Age : 67 Years, Occupation : House wife
Both applicant No.02 & 03 residing at
Residing at B-404, New Nityanand CHS Ltd,
Plot No.28, Sector No.03, New Panvel (E),
Maharashtra-410206
Versus
NIL

WHEREAS the Applicants above named have filed the present Application for the grant of Heirship Certificate in respect of the immovable property more particularly described in the schedule hereinunder. The said immovable property was left behind by deceased Late Mrs.Govind Gajanan Gokhale, who expired on 14.10.2020 at New Panvel, Taluka Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206.

AND WHEREAS if any person/s is/are having any right, title, interest and/or benefit etc., in the immovable property mentioned in the schedule hereinunder, is/are hereby invited to submit his/her/their objection in this Court within a period of 30 days from the date of publiction of this Public Notice.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

1) Flat No.B-401 located at building known as New Nityanand CHS Ltd, Plot No.28, Sector No.03, New Panvel (E), Taluka : Panvel, District : Raigad, Maharashtra-410206

2) Flat No.B-404 located at building known as New Nityanand CHS Ltd, Plot No.28, Sector No.03, New Panvel (E), Taluka : Panvel, District : Raigad, Maharashtra-410206

As such, if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of publication of this Public Notice, the Application of the Applicants shall be allowed and the Heirship Certificate as prayed for shall be granted.

Given my hands and seal of this Court of this 04/06/2022

Sd/- Judicial Clerk Seniour Division, Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superitent. Seniour Division, Panvel

# संक्षिप्त...

## आपत्ती व्यवस्थापन सज्ज राहण्याचे आदेश : तहसीलदार

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तहसीलदार कार्यालयात तहसीलदार रोहन शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन सभा संपन्न झाली. यावेळी मुरुड तहसीलदार रोहन शिंदे म्हणाले की पावसाळा सुरु झाला आहे. पूर, वादळ, वीज कोसळणे, अतिवृष्टी यासह विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींशी मुकाबला करण्यासाठी व्यवस्थापन आवश्यकच आहे. त्यासाठी विविध यंत्रणा सज्ज करा असे आदेश यावेळी मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी दिले. तसेच आपत्ती निवारणासाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री तसेच यंत्रणेचा आढावा आपत्ती व्यवस्थापन आराखड्याद्वारे घ्यावी. एकूणच आपत्ती व्यवस्थापन हे जबाबदारीचे काम आहे. तालुका स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाचा स्तर उंचावणे, धोका व आपत्तींचे योग्य विश्लेषण करुन आपत्ती काळात जिवीत व वित्त हानी कमी करण्याचा प्रयत्न करणे, जीवित, वित्त व पर्यावरणाचे रक्षण करणे, आपत्तींविषयी जनजागृती करणे, आपतग्रस्तांचा शोध घेऊन त्यांना मदत करणे व त्यांचे पुनर्वसन करणे, नियंत्रण कक्षाद्वारे आपत्तींवर देखरेख ठेवणे, आपत्ती निवारणाचे नियोजन करणे. तालुक्यातील सर्व संपर्क यंत्रणा सुस्थितीत आहेत याची खात्री करणे, तालुका स्तरावरील आपत्तीच्या घटनांची माहिती तयार करणे आशी माहिती मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी यावेळी दिली. तसेच सदरचे नियंत्रण कक्ष २४ तास चालू असुन जनतेस आव्हान करण्यात येते की कोणत्याही स्वरुपाची आपत्तकालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरीत मुरुड तहसीलदार ०२९४४२७४०२६, नगरपरिषद ०२१४४२७४०२२, मुरुड पोलीस ठाणे ०२१४४२७४०३३, रेवदंडा पोलीस ठाणे ०२१४१२४००३३ त्वरीत नियंत्रण कक्षाकडे कळावे असे आवाहन मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले. या सभेला मुरुड तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस निरीक्षक नितिन गवारे, नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, पंचायत समिती गटविकास अधिकारी सुभाष वाणी, नगरपरिषद लिपिक मनोज पुलेकर, सहाय्यक बंदर निरीक्षक, (राजपुरी) यशोधन कुलकर्णी, बांधकाम उप अभियंता आर. आर. गोरे, कोस्ट गार्डचे अधिकारी अमोल शिंदे, वैद्यकीय अधिकारी (मुरुड) डॉक्टर अमित मेटे, मत्स्य व्यवसाय परवाना अधिकारीअ. का. कदम, आगर व्यवस्थापक सुनील वाकचौरे, सहाय्यक बंदर निरीक्षक ( बोर्ली – मांडला) देवदास पोटे, वनविभाग अधिकारी ए.एस. सहारे आदींसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# सिटी बेल आयोजित आदर्श लोकसेवक पुरस्कार सोहळा शानदार पद्धतीने संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अल्पावधीतच वाचकांच्या मनावर रुंजी घालणाऱ्या सिटी बेल वृत्त समूहाच्या वतीने असामान्य व आदर्श लोकसेवक पुरस्कार सोहळ्याचे शुक्रवार दिनांक ३ जून रोजी सायंकाळी आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती ताई तटकरे यांना या पुरस्कार सोहळ्यात असामान्य लोकसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.खासदार श्रीरंग (अप्पा) बारणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासमवेत आमदार प्रशांत ठाकूर, आमदार बाळाराम पाटील, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत,पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर सी घरत, शिवसेनेचे रायगड जिल्हा सल्लागार तथा प्रवक्ते बबनदादा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रशांत भाऊ पाटील, शिवसेनेचे महानगरप्रमुख रामदास शेवाळे प्रमुख अतिथी म्हणून मंचावर विराजमान होते. पनवेलच्या विरुपाक्ष हॉल येथे हा शानदार सोहळा संपन्न झाला.





कोरोना विषाणू संक्रमण काळामध्ये पालकमंत्री म्हणून आदिती ताई तटकरे यांनी केलेल्या अप्रतिम कार्याबद्दल त्यांचा असामान्य लोकसेवक म्हणून सन्मान करण्यात आला. पनवेल येथील लाईफ लाईन हॉस्पिटल च्या डॉक्टर जयश्री प्रकाश पाटील यांच्या शुभहस्ते आदिती ताई तटकरे यांचा सन्मान करण्यात आला. टाळेबंदी च्या काळामध्ये अविरत कार्य करणाऱ्या रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ या संस्थेला असामान्य लोकसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेचे सचिव, पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आसामान्य लोकसेवक पुरस्काराचा स्वीकार केला. तर जे एम म्हात्रे चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेला देण्यात आलेल्या असामान्य लोकसेवक पुरस्काराचा संस्थेचे अध्यक्ष तथा पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी पुरस्काराचा स्वीकार केला. कामगार क्षेत्रामध्ये अफाट कार्यकर्तृत्व गाजविणारे व कामगार चळवळ आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाणारे कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांना या क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल असामान्य लोकसेवक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर स्वतः अल्पशिक्षित असून देखील शिक्षणक्षेत्रात तब्बल बारा शिक्षण संस्थांची निर्मिती करणारे शिवसेना सल्लागार तथा प्रवक्ते बबनदादा पाटील यांना असामान्य लोकसेवक पुरस्काराने गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सिटी बेल वृत्त समूहाचे समूह संपादक मंदार दोंदे यांनी प्रास्ताविक सादर केले.सिटी बेल वृत्त समूहाचा प्रवास आणि पुरस्कर सोहळ्याचे प्रयोजन या बाबत त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. त्यानंतर पुरस्कार प्राप्त प्रभुतींचा अल्प परिचय करून देणारा सिटी बेल विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून सिटी बेल वृत्तसमूह करत असलेल्या घोडदौडीबद्दल समूह संपादक विवेक मोरेश्वर पाटील समूह संपादक मंदार दोंदे आणि टेक्नॉलॉजी डायरेक्टर वैभव सोनटक्के यांची प्रशंसा केली. आदिती ताई तटकरे यांनी आपले मनोगत व्यक्त करते वेळी सिटी वृत्त समूहाने केलेल्या सन्मानाबद्दल त्यांचे आभार मानले. पुरस्कार प्राप्त प्रभुतींचे मनःपूर्वक अभिनंदन केले.तर त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असणाऱ्या डॉक्टर जयश्री पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केल्याबद्दल अत्यानंद झाला असल्याचे सांगितले. खासदार श्रीरंग बारणे यांनी सिटी बेल वृत्त समूहास आगामी काळात यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रपती पदक विजेत्या व दर्जेदार सिनेमा नाटक यांची निर्मिती करणाऱ्या रंगनिल संस्थेच्या संस्थापिका कल्पना विलास कोठारी. आणि इंडियन आयडॉल स्पर्धा आपल्या सुरेख गायकीच्या जोरावर जिंकणारा सागर विश्वास म्हात्रे यांचे यावेळी विशेष पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आले.

या पुरस्कार सोहळ्यामध्ये वेगळ्या वाटेवरचे यशस्वी उद्योजक म्हणून डी एम शिप रिपेअर चे सूरदास गोवारी यांना आदर्श लोकसेवक पुरस्कार देण्यात आला. सामाजिक क्षेत्रामध्ये अतुलनीय कार्य करणारे रवीशेठ पाटील यांचा सन्मान करण्यात आला. परदेशातील ऐश्वर्य झुगारून देशबांधवांची रुग्णसेवा करण्यासाठी झटणारे, कोकण विभागातील पहिले एसआरसीएस ऑर्थोपेडिक सर्जन अभीतेज मस्के यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर वैद्यकीय क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे डॉक्टर रुपेश वडगावकर आणि आयुष टास्क फोर्स च्या माध्यमातून कोरोना काळात अविरत रुग्णसेवा देणारे डॉ.अमित भक्तिकुमार दवे यांना आदर्श लोकसेवक पुरस्कार देण्यात आला. पनवेल पंचायत समितीचे विद्यमान सदस्य तथा शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील यांना आदर्श लोकसेवा पुरस्कार बहाल करण्यात आला.

आदर्श ग्राम विकास अधिकारी म्हणून नंदकिशोर कृष्णा भगत आणि मोहन देविदास पाटील यांना सन्मानित करण्यात आले.आदर्श सरपंच म्हणून शिवकर चे सरपंच अनिल ढवळे यांना सन्मानीत करण्यात आले.माजी सरपंच विश्वास भगत यांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. लोकप्रतिनिधी कॅटेगरीमध्ये नगरसेवक विजय चीपळेकर, नगरसेवक गोपाळ भगत, नगरसेवक सतीश पाटील आणि नगरसेवक विकास घरत यांना सन्मानित करण्यात आले. भारतीय जनता पार्टी चे उपाध्यक्ष सतीश दत्ता पाटील यांना ते करत असलेल्या अप्रतिम समाजसेवेसाठी आदर्श लोकसेवा पुरस्कार बहाल करण्यात आला. युवा नेते समीर मढवी,समीर माखेचा, माथाडी कामगार व जनरल कामगार यांना न्याय मिळवून देण्यासाठी झटत असणारे बाळासाहेब बोरकर आणि प्रभुदास भोईर, वास्तुतज्ञ महेश सुर्वे यांना आदर्श लोकसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे अंती समूह संपादक विवेक मोरेश्वर पाटील यांनी आभार प्रदर्शन केले तसेच लवकरच, समाजाचे आरोग्य अबाधित ठेवणाऱ्या आरोग्य रक्षकांचा येत्या डॉक्टर दिनानिमित्त सन्मान करणार असल्याचे जाहीर केले.

# पांडवकडा धबधबा पर्यटकांसाठी यंदाही बंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघरमधील पांडवकडा धबधबा पर्यटकांसाठी नेहमीच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आला आहे. मात्र, पर्यटकांचा अतिउत्साहीपणा हा त्यांच्याच जिवावर बेतत असल्याचे अनेक वेळा पाहावयास मिळते. यामुळेच वन विभागाने धबधब्यावर पांडवकडा पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, तर पनवेलमधील इतर पर्यटस्थळाबाबत सोमवारच्या बैठकीत निर्णय होणार आहे. वन विभागाच्या या निर्णयामुळे पर्यटकांचा हिरमोड होणार आहे..

खारघर शहराला नैसर्गिक सौंदर्य लाभले आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेला पांडवकडा धबधबा हादेखील शहराला ओळख प्राप्त करून देणारे पर्यटनस्थळ बनले आहे. दरवर्षी हजारोंच्या संख्येने पर्यटक या गेलेला आहे. धबधब्याला भेट देत असतात. मात्र, काही हौशी पर्यटक वन विभागाने घातलेली बंदी झुगारून आततायीपणा करत असतात. त्यामुळे काहींना आपला जीवदेखील गमवावा लागला आहे. आजवर याठिकाणी बळी गेलेल्या पर्यटकांचा आकडा शेकडोच्या वर गेलेला आहे ठाणे, कल्याण, मुंबई, उपनगर, रायगड आदी ठिकाणांहून पर्यटक याठिकाणी येत असतात.

दरवर्षी वन विभाग पर्यटकांना याठिकाणी प्रवेशबंदी असल्याचे बोर्ड लावत असते. यावर्षीदेखील या कामाला सुरुवात आहे. झाली आहे. दर्शनी भागात पर्यटकांना सध्या शह प्रवेशबंदी असल्याचे सूचना फलक आम्ही लावणार आहोत, असे वन नियमांचे विभागाचे वरिष्ठ अधिकारी डी.एस.सोनवणे यांनी सांगितले. परवानगीशिवाय वन हद्दीत प्रवेश करणे हा कायद्याने गुन्हा आहे.

# एमएमआरडीएमुळेच माथेरान विकासाच्या वाटेवर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

एमएमआरडीएच्या १२३ कोटी रुपयांच्या भरीव निधीमुळे याच माध्यमातून होत असणाऱ्या विकास कामांमुळेच आजवर विकास कामांच्या प्रतीक्षेत असणारे माथेरान खऱ्या अर्थाने अनेक वर्षानंतर हे पर्यटनक्षेत्र विकासाची ओळख निर्माण करत आहे.प्रामुख्याने महत्वाचे पॉईंट्स यामध्ये जवळपास इतिहासजमा होण्याच्या मार्गावर असलेले पॅनोरमा पॉईंट, मायरा पॉईंट, त्याचप्रमाणे एको पॉईंट, मंकी, हार्ट पॉईंटचे सुशोभीकरण केल्यामुळे या मुख्य पॉइंटसला नवसंजीवनी प्राप्त झाली आहे.

दस्तुरी पार्किंग साठी सुध्दा चांगल्या प्रकारे नियोजित पद्धतीने कामे पूर्ण केली आहेत. परंतु नगरपरिषदेच्या आणि वनखात्याच्या दुर्लक्षामुळे त्या ठिकाणी अन्य इमारतीच्या सामानाचे ढीग होत गेल्याने जागेअभावी मोटार वाहने पार्किंग करताना खाजगी वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. उत्तम प्रकारे दस्तुरी पार्किंगची कामे करण्यात आली आहेत यापुढेही जर त्याठिकाणी अशा प्रकारे इमारतीचे सामान ठेवण्यात आले तर भविष्यात ही जागा अपुरी पडणार आहे त्यामुळे साहजिकच पर्यटक माघारी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होत आहे त्यासाठी योग्य तो बंदोबस्त करून ह्या सर्व सामानाची वेगळी जागा निश्चित करणे गरजेचे बनले आहे.



एमएमआरडीए च्या माध्यमातून दस्तुरी ते पांडे रोड हा संपूर्ण रस्ता धूळ विरहीत होण्यासाठी सनियंत्रण समितीच्या परवानगीने क्ले पेव्हर ब्लॉक मध्ये करण्यात येत आहे त्यामुळे इथे निम्म्याहून धुळीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. एमएमआरडीए आपल्या परीने विकासाला चालना देण्यासाठी पुरेपूर सहकार्य जरी करत आहेत तरीसुद्धा प्रामुख्याने इथल्या गलिच्छ राजकारणाचा देखील त्याना सामना करावा लागत आहे. काहींच्या अपेक्षा होत्या त्याप्रमाणे त्यांच्या मागण्या अप्रत्यक्षपणे पूर्ण केल्यामुळे क्ले पेव्हर ब्लॉक रस्त्याची कामे मार्गी लागली आहेत अन्यथा चार लोक सोबत घेऊन विरोधात जाणारे महाभाग इथे मोठया प्रमाणावर आहेत. त्यामुळेच कामे पूर्ण करण्यासाठी अनेकांचे तोंड गोड केल्यामुळेच आजही ही कामे प्रगतीपथावर दिसत आहेत. मुख्य रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक लावण्यात आलेले आहेत हे निकृष्ट दर्जाचे आहेत असे संबंधित ठेकेदारांना वारंवार सूचित करण्यात आले होते. परंतु ठेकेदाराने काही राजकीय मंडळींच्या महत्वपूर्ण अपेक्षा पूर्ण केल्यामुळे याकडे कुणीही फारसे गांभीर्याने लक्ष केंद्रित केले नाही की नगरपरिषदेच्या संबंधित अधिकारी वर्गाने सुध्दा याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला आहे.रस्त्याला लावण्यात आलेले क्ले पेव्हर ब्लॉक निकृष्ठ दर्जाचे आहेत ते जेमतेम इथल्या रहदारीमुळे दोन ते तीन वर्षे तग धरू शकतात. परंतु तुर्तास का होईना पावसाळ्यात इथल्या मातीची धूप थांबणार असून लिद मिश्रित धुळीचा प्रादुर्भाव थोडया प्रमाणात का होईना कमी झाला असल्यामुळे व्यापारी वर्गाने सुटकेचा निश्वास सोडला आहे.

# आ. रवीशेठ पाटील आज नागोठण्यात ; विभागातील विविध विकासकामांचे होणार लोकार्पण

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

कार्यसम्राट आमदार रवीशेठ पाटील यांनी नागोठणे शहर व नागोठणे विभागात त्यांच्या आमदार निधीतून विकास कामांना निधी देण्याचा धडाका सुरू ठेवलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून नागोठणे विभागातील विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा आमदार व माजी कॅबिनेट मंत्री रवीशेठ पाटील यांच्या शुभहस्ते आज रविवार दिनांक ५ जून रोजी सकाळी अकरा वाजता सुरू होणार असल्याची माहिती भाजपाचे नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी दिली. आ. रविशेठ पाटील नागोठणे विभागात येत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे.



नागोठणे विभागातील या लोकार्पण सोहळ्याची सुरुवात नागोठण्याजवळील पळस गावाची ग्रामदेवता श्री पळसाई मातेचे दर्शन घेऊन होणार आहे व शेवट जिल्ह्यातील वयोवृद्ध ज्येष्ठ नेते शि.ल. पाटील यांची त्यांच्या वेलशेत येथील निवासस्थानी भेट घेऊन वेलशेत येथे होणार आहे.

आ. रविशेठ पाटील यांच्या या लोकार्पण सोहळ्यात पळस येथील अंतर्गत रस्त्या, वाघळी येथील अंतर्गत रस्ता, निडी येथील समाज मंदिर, वासगाव येथील धनगर वाडीतील अंतर्गत रस्ता, चिकणी येथील अंगणवाडी, पाटणसई येथील अंतर्गत रस्ता, हेदवली येथील अंतर्गत रस्ता, बाळसई येथील अंतर्गत रस्ता, वरवठणे येथील रस्ता, पिंगोडे शाळा ते आंबेघर रस्ता कॉंक्रिटीकरण, आंबेघर येथील अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण, वेलशेत येथील अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण, वेलशेत येथील व्यायाम शाळा या विकासकामांचा समावेश आहे. या कार्यक्रमास सर्व कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपाचे नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी व विभागीय अध्यक्ष संतोष लाड यांनी केली आहे.

# नवी मुंबईतील पोलीस हवालदारचा मुलगा झाला इंडियन आर्मीत लेफ्टनंट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलिस खात्यात पोलीस हवालदार पदावर कार्यरत असलेले शंकर कदम यांचा मुलगा निखिल कदम यांने आपल्या आयुष्यातील खूप मोठे ध्येय प्राप्त केले आहे. त्याने आपले राष्ट्रीय संरक्षण अकादमीचे ट्रेनिंग पूर्ण करून त्याची इंडियन आर्मीच्या लेफ्टनंट या पदावर नियुक्ती झाली आहे. या नियुक्तीबद्दल निखिल कदम यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

२० वर्षीय निखिल कदम (मूळ गाव–आजरा, कोल्हापूर) हा त्याच्या कुटुंबीयांसह सुकापुर येथे राहत आहे. लहानपणापासूनच त्याला आर्मीची आवड आहे, आर्मीत जाण्याचे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न त्याने सत्यात उतरवले आहे. यासाठी त्याला नवी मुंबई–सिवूड वाहतूक शाखेत काम करणारे त्याचे वडील शंकर कदम व कुटुंबियांची साथ मिळाली. लेफ्टनंट झाल्यानंतर निखिल कदम याला नवी मुंबई परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शिवराज पाटील यांनी त्यांचे मनापासून अभिनंदन केले. यावेळी त्याच्यासह खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे, पोलीस हवालदार वडील शंकर कदम उपस्थित होते. सामान्यातून अशा प्रकारची यशस्वी कारकीर्द पूर्ण करताना काय मेहनत घ्यावी लागते याचा प्रत्यय यावेळी नियुक्त झालेल्या निखिल कदम याने बोलून दाखवला. लेफ्टनंट पदावर नियुक्ती झालेला निखिल कदम हा इंडियन मिलिटरी, डेहराडून येथे जाणार आहे.



यावेळी पोलीस उपायुक्ताकडून मिळालेल्या शाब्बासकीबद्दल निखिल कदम याने समाधान व्यक्त करताना ,ज्या मुलांचे अशा प्रकारचे ध्येय आहे अशांनी अथक परिश्रम करणे हा एकमेव उपाय असून कोणत्याही मुलाने खचून न जाता परिश्रम करत राहिल्याने ध्येय प्राप्ती नक्की होते अशा प्रकारचे आवाहन केले.

# पनवेल महानगरपालिकेसमोर ॲड.नागेश हिरवे यांचा आत्मदहनाचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिकेसमोर ॲड. नागेश हिरवे यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, अंगावर रॉकेल टाकून स्वतःला जाळण्याचा त्यांचा प्रयत्न फसला आहे. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पनवेल शहरातील जुन्या कन्या शाळेच्या जागी बांधण्यात आलेल्या नव्या इमारतीमधील शाळेला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, असा ठराव महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. मात्र, शहरातील स्वातंत्र्यसेनानी उत्तराधिकारी संघटना, संघटनेचे सदस्य आणि हुतात्मा हिरवे गुरुजी यांचे नातू ॲड.नागेश हिरवे यांनी या कन्या शाळेच्या जागेवर बांधण्यात आलेल्या नव्या इमारतीला हुतात्मा हिरवे गुरुजी यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी केली. याबाबत पालिकेला १ जूनपर्यंत मुदत दिली होती.

१ जूनपर्यंत नावाबाबत झाले नाही तर पालिकेच्या समोर येऊन आत्मदहन करण्याचा इशारा नागेश हिरवे यांनी दिला होता आणि त्याच अनुषंगाने १ जून रोजी नागेश हिरवे यांनी पालिका कार्यालयासमोर येऊन स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. अंगावर रॉकेल ओतून काडी पेटवणार एवढ्यातच पनवेल पोलिसांनी नागेश हिरवे यांना ताब्यात घेऊन पनवेल शहर पोलीस स्टेशनमध्ये आणले. यावेळी आमचा दि. बा. पाटील यांच्या नावाला विरोध नाही. मात्र, ज्या ठिकाणी शाळा होत आहेत त्यात एक मराठी आणि दुसरी इंग्रजी माध्यमाच्या दोन शाळा आहेत, त्यात इंग्रजी माध्यमाला दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे तर मराठी माध्यमाला स्वातंत्र्यसेनानी हिरवे गुरुजींचे नाव कायम ठेवावे, अशी मागणी नागेश हिरवे यांनी केली आहे.

